Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 04 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०४ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

नौदल दिवस आज साजरा होत आहे. १९७१ मध्ये ट्रायडंट अभियानादरम्यान पाकिस्तानच्या हल्ल्याला प्रत्यूत्तर देत चार पाणबुड्यांना समुद्रात बुडवण्यात भारतीय नौदलाला यश आलं होतं. यामध्ये शेकडो पाकिस्तानी नौदलाचे कर्मचारी मारले गेले होते. या विजयाची आठवण म्हणून नौदल दिवस साजरा केला जातो. नौदलाच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यानिमित्त पुरी इथं ब्ल्यू फ्लॅग बीच वर होणार्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सहभागी होणार आहेत. नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी यावेळी उपस्थित असतील.

****

राज्यात भारतीय जनता पक्षाच्या गटनेत्याची निवड करण्यासाठी नवनियुक्त आमदारांची आज मुंबईत बैठक होत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी निरिक्षक म्हणून या बैठकीला उपस्थित आहेत. या बैठकीनंतर राज्यातलं सरकार स्थापनेचं चित्र स्पष्ट होईल. नवीन सरकाचा शपथविधी उद्या मुंबईत आझाद मैदानात होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री, राष्ट्रीय लोकशाही आघाडी शासित राज्यांचे मुख्यमंत्री देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत.

****

तेलक्षेत्र नियमन आणि विकास सुधारणा विधेयक २०२४ ला काल राज्यसभेत मंजुरी देण्यात आली. या विधेयकाअंतर्गत तेलक्षेत्र नियमन आणि सुधरणा विधेयक १९४८ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. धोरणात स्थैर्य, विवादांचं सुलभ निराकरण या विधेयकामुळे सोपं होईल, तसंच तेल आणि वायू क्षेत्रात व्यवसाय करणं सुलभ

होईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी सांगितलं. मागच्या तीन वर्षात तेलांच्या किमती कमी झाल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

बँकिंग कायदे सुधारणा विधेयक २०२४ पारीत करण्यासंदर्भात लोकसभेत काल चर्चा करण्यात आली. या विधेयकानुसार नॉमिनीजची संख्या चारपर्यंत वाढवण्यात येणार आहे. या विधेयकानुसार बँकांना त्यांच्या लेखापरीक्षकांचे मानधन ठरवण्याचा अधिकारही देण्यात येणार आहे. या सुधारणांमुळे बँक प्रशासनात अधिक बळकटी येणार असून, ग्राहकांना चांगल्या सुविधांचा लाभ होईल, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितलं. तर बँकिंग कायद्यांकडे वेगळं न पाहता देशाच्या एकूण आर्थिक स्थितीसह त्याचा विचार करायला हवा असं काँग्रेस खासदार गौरव गोगोई म्हणाले.

****

जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगर इथल्या दाचिगाम जंगलात झालेल्या चकमकीत जुनैद अहमद भट हा कुख्यात दहशतवादी ठार झाला. दाचिगाम भागात दहशतवादी लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोध मोहीम राबवली. यादरम्यान दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला, त्याला भारतीय सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिलं. भट हा लष्कर ए तोयबा या दहशतवादी संघटनेचा कमांडर असून, २० ऑक्टोबर रोजी गंदरबल जिल्ह्यात बोगदा बांधकामाजवळ झालेल्या स्फोटात त्याचा सहभाग होता, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

भारतीय स्टेट बँकेनं आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त काल मुंबईत पॅरिस २०२४ पॅरालिम्पिक स्पर्धेतल्या भारताच्या पॅरालिम्पिक विजेत्यांचा विशेष सन्मान केला. या कार्यक्रमात २९ पॅरालिम्पिक विजेत्यांना धनादेश प्रदान करून त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. एसबीआयमध्ये आम्हाला या विजेत्यांना प्रोत्साहन देण्याचा सन्मान लाभला आहे आणि आम्ही भारतीय क्रीडेसाठी समृद्ध, सर्वसमावेशक पर्यावरण तयार करण्यासाठी कटिबद्ध आहोत, असं भारतीय स्टेट बँकेचे अध्यक्ष सी.एस. सेट्टी यांनी यावेळी सांगितलं.

****

गडचिरोली शहरासह अन्य तालुक्यात आणि शेजारच्या चंद्रपूर जिल्ह्यातही आज भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू तेलंगणा राज्यातल्या मुलुगु इथं असून, भूकंपची तीव्रता पाच पूर्णांक तीन रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली.

अशा प्रकारचे धक्के पुन्हा जाणवल्यास नागरिकांनी दक्षता घ्यावी, घाबरून न जाता इमारतीबाहेर मोकळ्या जागेत सुरक्षित स्थळी आश्रय घ्यावा, असं आवाहन जिल्हाधिकारी संजय दैने यांनी केलं आहे. नागपूर इथं देखील आज भूकंपाचे अतीसौम्य झटके जाणवले.

****

नांदेड शहरात आनंदनगर भागात आज पहाटे नैवेद्यम हॉटेलसह जीव्हीसी मोबाईल शॉपीला आग लागली. या आगीने नैवेद्यम हॉटेलच्या वरच्या मजल्यावर असलेल्या वैष्णवी मुलींच्या हॉस्टेललाही आगीने वेढले. त्याचवेळी जवळच असलेल्या एका मोबाईल शॉपी आणि श्री महालक्ष्मी ऑईल शोरूमचंही आगीमुळे मोठं नुकसान झालं. अग्निशमन दलाने हॉस्टेलमधून मुलींची सुखरूप सुटका केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

****

ओमान मधल्या मस्कत इथं सुरु असलेल्या पुरुषांच्या कनिष्ठ हॉकी आशियाई स्पर्धेत मलेशियाला नमवून भारतानं अंतिम फेरीत धडक मारली आहे. आज झालेल्या सामन्यात भारताने मलेशियाचा तीन – एक असा पराभव केला. अजिंक्यपदासाठी आज भारताची लढत पाकिस्तानसोबत होणार आहे.

****

फेंजल चक्रीवादळाचा परिणाम राज्यातल्या वातावरणावरही दिसून येत आहे. पुढच्या ४८ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकणात किनारपट्टी भागात सोसाट्याचे वारे वाहतील आणि मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

****